जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा

सफाईगार व माळी पदाकरीता अर्ज केलेल्या उमेदवारांकरीता

सुचना

जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा द्वारे दि. ०८/०४/२०२५ रोजी सफाईगाराची ०४ पदांची निवड यादी व ०२ पदांची प्रतिक्षा यादी तसेच माळीचे ०१ पदाची निवड यादी व ०१ पदाची प्रतिक्षा यादी तयार करण्याबाबतची जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा चे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करुन पदाकरीता पात्र उमेदवारांनी त्यांचे ऑफलाईन अर्ज पोस्टल ऑर्डर किंवा डिमांड ड्रॉफ्ट (Postal Order/ Demand Draft) इत्यादीसह परिशिष्ट-अ मधील नमुन्यानूसार आर.पी.ए.डी. द्वारे (R.P.A.D) दि. २३/०४/२०२५ रोजी सायंकाळी ०६.०० वा. पर्यंत या कार्यालयास पाठविण्याबाबत निर्देशीत करण्यात आलेले होते.

त्या अनुषंगाने उमदेवारांनी या कार्यालयास पाठविलेल्या अर्जांची पडताळणी केली असता ज्या उमेदवारांनी अर्जामध्ये अनुभवाची अर्हता नमुद केलेली आहे, त्यांनी ती शासकिय/निमशासकीय/संस्था/महानगरपालिका/नगरपरिषद/नगर पंचायती/महामंडळे/मंडळे येथे कंत्राटी पद्धतीवर किंवा बाहययंत्रणेद्वारे कंत्राटी/करार पद्धतीवर धारण केलेली आहे किंवा कसे ? याची अर्जात नमुद केल्याप्रमाणे मुळ अनुभव प्रमाणपत्रावरुन पडताळणी करण्याकरीता व त्यानुसार उमेदवारांची अल्पसूची तयार करण्याचे अनुषंगाने संबंधित मुळ अनुभव प्रमाणपत्र उपरोक्त कार्यालय/विभाग/संस्थांचे प्रमुख यांचे सही व कार्यालय/विभाग/संस्थांचे गोल शिक्क्यानिशी आर.पी.ए.डी. द्वारे (R.P.A.D) दि. २३/०५/२०२५ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत या कार्यालयास पोहोचेल या बेताने पाठविण्यात यावे.

तसेच उमेदवारांना पुढे असे ही निर्देशीत करण्यात येते की, जे उमेदवार त्यांचे मुळ अनुभव प्रमाणपत्र उपरोक्त कार्यालय/विभाग/संस्थांचे प्रमुख यांचे सही व कार्यालय/विभाग/संस्थांचे गोल शिक्क्यासह उपरोक्त नमुद तारखेपर्यंत सादर करणार नाही, तथापि, मुळ अनुभव प्रमाणपत्रा ऐवजी प्रमाणपत्राची छायांकित प्रत या कार्यालयास सादर करेल अशा उमेदवारांचे अर्ज गृहित धरल्या जाणार नाही याबाबत उमेदवारांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ०८/०५/२०२५.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
वर्धा